

# माध्यमविद्या

कोल्हापूर, मंगळवार, दि. २२ जानेवारी २०१९ | खासगी वितरणासाठी


# ‘एन. डी.’ सर्वसामान्यांचा आधारवड

## खा. शरद पवार यांचे गौरवोद्गार : रा. कृ. कणबरकर पुरस्काराचे शानदार वितरण

**कोल्हापूर : निळकंठ सोनार**

समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळाला पाहिजे, या भूमिकेतून गेली सहा दशके ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. एन. डी. पाटील सातत्याने झटत आहेत. शिवाजी विद्यापीठाने रा. कृ. कणबरकर पुरस्कारासाठी योग्य व्यक्तीची निवड केली आहे, असे गौरवोद्गार ज्येष्ठ नेते, खा. शरद पवार यांनी काढले.

ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ रा. कृ. कणबरकर यांच्या नावाचा पुरस्कार प्रा. एन. डी. पाटील यांना खा. पवार यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी खा. पवार बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे, सरोज पाटील, प्राचार्य पी. ए. खोत आदी उपस्थित होते. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे होते.




**कोल्हापूर : सहा तपाहून अधिक काळ सार्वजनिक जीवनात सर्वसामान्यांसाठी झटणारे प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना ज्येष्ठ नेते खा. शरद पवार यांच्या हस्ते रा. कृ. कणबरकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी डावीकडून कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे, सरोज पाटील, प्राचार्य पी. ए. खोत.**

खा. पवार यांनी प्रा. एन. डी. पाटील यांच्या समाजासाठीच्या उल्लेखनीय कामांची यावेळी प्रशंसा केली. **(पान चार वर)**

**पुरस्काराची रक्कम गुरुवर्य खैरमोडे स्मारकासाठी!**

गुरुवर्य रामकृष्ण वेताळ खैरमोडे या दलित विद्यार्थ्याला कर्मवीर अण्णांनी घडवले. पुढे खैरमोडे यांनी आष्ट्यात न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना केली. त्यांच्या कार्याचा उचित सन्मान व्हावा, म्हणून मला मिळालेली पुरस्काराची १ लाख ५१ हजार रुपये मी खैरमोडे यांच्या स्मारकासाठी रयत शिक्षण संस्थेकडे सुपूर्द करत आहे, अशी घोषणा प्रा. एन. डी. पाटील यांनी करताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला.

**या नारायणचा सूर्य कधी ढळणार नाही...!**

भा. रा. तांबे यांच्या कवितेचा संदर्भ देत खा. पवार यांनी ‘या नारायणचा सूर्य कधी ढळणार नाही’ या शब्दांत प्रा. एन. डी. पाटील यांचा गौरव केला.

# पत्रकारिता विभागात राष्ट्रीय परिसंवाद

## दि. ७ ते ८ मार्च रोजी आयोजन : डॉ. निशा मुडे-पवार यांची माहिती

**कोल्हापूर : अर्चना बनगे**

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त ‘प्रादेशिक दूरचित्रवाणीमध्ये महिलांचे स्थान’ या विषयावर दि. ७ व ८ मार्चला दोन दिवसीय राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत देशभरातील संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक, माध्यम तज्ज्ञ, विभागप्रमुख, समन्वयक आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती अधिविभाग प्रमुख डॉ. निशा मुडे - पवार यांनी दिली.

डॉ. मुडे - पवार म्हणाल्या, पत्रकारिता विभागाला ५० वर्ष पूर्ण होत आहेत. या सुवर्ण महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. यामध्ये स्टुडंट कॉंग्रेस, माहिती पुस्तक प्रकाशन, आजी - माजी विद्यार्थी मेळावा, स्पार्क फिल्म फेस्टिवल, शिवाजी विद्यापीठात फिल्म क्लबची स्थापना आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. या अंतर्गतच राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्या म्हणाल्या, माध्यमामध्ये महिला या विषयाला स्थान देण्यात येत आहे. या कार्यशाळेमध्ये प्रादेशिक दूरचित्रवाणीमधील महिलांना रोजगाराची संधी, दूरचित्रवाणीमधील यशस्वी महिला पत्रकारांच्या यशोगाथा, प्रादेशिक दूरचित्रवाणीतील महिलांचे चित्रीकरण, दूरचित्रवाणीमधील महिलांचे बदलते स्वरुप आणि आव्हाने, महिलाकेंद्रित टीव्ही मालिका आणि महिला कार्यक्रम, महिला पत्रकारांसाठी व्यवस्थापनाची धोरणे, पत्रकार महिलांवरील हिंसेविरूद्धचे कायदे, प्रादेशिक दूरचित्रवाणीमध्ये महिलांचे स्थान आदी विषयांवर परिसंवादात चर्चा करण्यात येणार आहे.

या परिसंवादामध्ये तज्ज्ञ अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक आदी आपापले संशोधन पेपर सादर करणार आहेत. या सादरीकरणासाठी सॉफ्ट कॉपी तसेच पीपीटी प्रेझेन्टेशन करण्यात येणार आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

## राष्ट्रीय सेवा योजनेतून सामाजिक बांधिलकी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एन.एस.एस) माध्यमातून हजारो विध्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जोपासना केली जात आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेतानाच मुलांमध्ये सेवा कार्याची आवड निर्माण व्हावी आणि ते कामात सक्रिय व्हावेत या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आली. यातून अनेक उपक्रम सुरु झाले आहेत. महाविद्यालय दर वर्षी एक गाव दत्तक घेऊन श्रमसंस्कार शिबीर आयोजित करते. याच बरोबर स्वच्छता अभियान, रक्तदान असे अनेक उपक्रम राबविले जातात.

# शिवाजी महाराज आता एका लिंकवर

## शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राचा अभिनव उपक्रम

**कोल्हापूर : राहूल गायकवाड**

शिवाजी विद्यापीठाच्या ५६ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून छ. शिवाजी महाराज यांच्याविषयीची इत्यंभूत माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राने एका लिंकवर उपलब्ध करून दिली आहे. यामध्ये संशोधन, साहित्य, माहितीपट आणि चित्रपट आर्दींचा समावेश आहे. http://www.unishivaji.ac.in/library/Compiled-Online-Literature-on-Chhatrapati-Shivaji-Maharaj या लिंकवर ही सर्व माहिती उपलब्ध आहे.

या लिंकचे अनावरण शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठाला शिवाजी महाराज यांचे नाव देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि कारकिर्दिचा आढावा जगासमोर मांडणे हे विद्यापीठाचे प्रथम कर्तव्य आहे. यावेळी बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, डॉ. डी. बी. सुतार उपस्थित होते.

डॉ. खोत म्हणाल्या, या लिंक वर छत्रपती शिवाजी महाराज यांचे मुद्रित आणि ऑनलाईन साहित्य एकत्रितरीत्या जागतिक पातळीवर पोहोचले, अशी अपेक्षा आहे. शाहु संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील डॉ. बाळकृष्ण लिखीत ‘शिवाजी द ग्रेट’ ग्रंथाचे अलिकडेच प्रकाशन करण्यात आले.

